International Research Journal ISSN-0975-3486 VOL. I * ISSUE—6 RNI : RAJBIL/2009/30097

*शोधपत्र-राज्यशास्त्र*

March, 2010

# समाज परिवर्तनाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

* डॉ. विलास आघाव

*प्रपाठक व विभाग प्रमुख, राज्यशास्त्र आदर्श महाविद्यालय, हिंगोली

भारतातील दलित जाती जमातींना भोगाव्या लागणाऱ्या दारिद्र्याचे मूळ सर्व बाजूंनी होणाऱ्या आर्थिक शोषणात आहे. त्या आर्थिक थरत्यातून अस्पृश्य जोपर्यंत मुक्त होत नाहीत तोपर्यंत त्यांना कोणतेही भवितव्य नाही. हिंद समाजव्यवस्थेने त्यांचे जिणे अगथी परावलंबी व दयनीय करून टाकले आहे. म्हणूनच समाजाची वर्गव्यवस्था पूर्णपणे बदलली पाहिजे व धर्मव्यवस्थेने त्यांच्यावर हजारो वर्षे लादलेल्या मानसिक गुलामगिरीतून ते मुक्त झाले पाहिजेत याची निकड आंबेडकरांना जाणवली. अस्पृश्य समाजाच्या उध्दाराचे कार्य यशस्वी रित्या चालवावयाचे तर त्याकरिता दलित वर्गाला शिक्षित करणे; त्यांना संघटित करून त्यांच्यातील न्यूनगंड दूर करून त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करणे व समतेच्या लढ्याकरिता त्यांना सिध्द करणे आवश्यक होते. फुले दाम्पत्याने केलेल्या परिश्रमामुळे त्या समाजात विद्यार्जनाची प्रेरणा निर्माण झाली होती हे खरे. पण, समतेच्या लढ्याकरिता त्यांना प्रवृत्त करावयाचे तर लोकजागृतीचे सर्वोत्तम साधन वृत्तपत्र हाती असण्याची निकड आंबेडकरांना जाणवली. छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या अडीच हजार रुपयांच्या आर्थिक सहाय्याच्या बळावर त्यांनी प्रथम 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. अस्पृश्यांच्या हिताअहितांची चर्चा करावी, त्यांचे दु:ख वेशीवर टांगावे.त्यांच्यावर होणारा अन्याय व अत्याचार सरकारपुढे मांडावा व त्या प्रबोधनातून सामाजिक परिवर्तनाचा विचार समाजात रुजवावा हे उद्दिष्ट होते.

३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' चा पहिला अंक बाहेर पडला. परंतु हे वृत्तपत्र, तसेच त्यानंतर आंबेडकरांनी सुरू केलेली 'बहिष्कृत भारत' 'समता पत्र', 'जनता पत्र' व 'प्रबुध्द भारत' ही वृत्तपत्रे फार काळ चालू शकली नाहीत. अस्पृश्योद्धाराच्या हेतूने त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा प्रस्थापित करून त्याद्वारे, त्या समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता प्रयत्न करणे, त्यांना संघटित करून सामाजिक समता व न्याय या करिता लढा देणे, तळी, देवळे, शिक्षणसंस्था अशा सार्वजनिक ठिकाणी त्यांना प्रवेश व समतेचे हक्क मिळवून देणे अशा कार्याला त्यांनी गती दिली. सवर्णांनी केलेल्या सक्रिय विरोधाला न जुमानता महाडचे चवथर तळे अस्पृश्यांना खुले करून देण्याकरिता त्यांनी आयोजित केलेला महाडचा सत्याग्रह, मनुस्मृती म्हणजे अस्पृश्यांच्या गुलामगिरीची सनद असे मानून १९२६ मध्ये त्या धर्मग्रंथाचे जाहिरपणे केलेले दहन. नाशिकच्या काळा रामाच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी उभे केलेले आंथेलन अशागोष्टी म्हणजे समतेकरिता त्यांनी चालविलेल्या दलित चळवळीतील महत्त्वाचे टप्पे होते. त्यामुळे अस्पृश्यता नाहीशी झाली किंवा त्या वर्गाचे दु:ख निवारण झाले असे नाही. परंतु अस्पृश्यांवर होणारा अन्याय व अत्याचार चव्हाट्यावर मांडून त्यांच्या ³ु:खाला वाचा फोडून दलित वर्गात नवा आत्मविश्वास बाणविणे, त्यांच्या ³ु:खाकडे समाजाचे लक्ष वेधणे व समाजातील अस्पृश्यतेचा कलंक नाहीसा झाला पाहिजे याची तीव्र जाणीव निर्माण करणे या दृष्टीने ती आंथेलने फलथयी ठरली यात शंका नाही.

समाजपरिवर्तनाची निकड सामान्य जनतेला पटवून सांगण्याचा एकीकडे प्रयत्न करीत असतांनाच, दुसरीकडे थलितांच्या ³ु:खाचा परिहार व त्यांच्या हक्कांची पूर्ती विधिमंडळातून कायद्यांद्वारे करून घेण्याचा प्रयत्नही आंबेडकरांनी चालविला होता. सायमन कमिशन, गोलमेज परिषथ यांसमोर थलितांच्या समस्या त्यांनी थ्मथरपणे मांडल्या. अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतथर संघांना १९३२ मध्ये मॅकडोनल्ड यांच्या जातीय निवाड्याने मंजूरी थ्लिी होती. परंतु तसे झाल्यास अगोथ्रच फुटीरतेची विषबाधा झालेल्या भारतीय समाजाचे अधिकाधिक तुकडे व्हायला वेळ लागणार नाही व राष्ट्रीय एकात्मतेवर तो कुठाराघात ठरेल हे जाणून गांधींनी जातीय निवाड्याला प्रखर विरोध केला आणि त्याकरिता आमरण उपोषण सुरू केले. गांधीची अमाप लोकप्रियता लक्षात घेऊन अस्पृश्यांकरिता राखीव जागा असाव्यात या अटीवर संयुक्त मतथर संघांना मान्यता थ्ेऊन आंबेडकरांनी नाईलाजाने तडजोड स्वीकारली. परंतु त्या राखीव जागाकरिता कॉंग्रेसने आपल्या पक्षातील अस्पृश्य उमेथ्वार १९३७ च्या निवडणुकात उभे करावे हे आंबेडकरांना पटले नाही त्यामुळे १९४४ मध्ये त्यांनी आपली विभक्त मतथर संघांची मागणी पुन्हा पुढे मांडली. विधिमंडळात अस्पृश्यांना आवश्यक ते प्रतिनिधित्व थ्ेण्याचा तोच एक मार्ग आहे असे त्यांना वाटत होते.

इ.स. १९४२ मध्ये कामगार खात्याचे प्रमुख म्हणून गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळावर आंबेडकरांची नियुक्ती झाली. १९४६ मध्ये घटनासमितीच्या निवडणुका झाल्या तेव्हा बंगालच्या विधिमंडळातून ते निवडून आले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताची राज्यघटना तयार करण्याच्या कामाला सुरुवात झाली तेव्हा मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. ती जबाबदारी स्वीकारताना अनुसूचित जाती जमातींकरिता घटनेत संरक्षणात्मक तरतुदी करणे, त्यांच्यावरील अन्यायांचे परिमार्जन करून त्यांचे हक्क कायद्याद्वारे त्यांना मिळवून देणे हा त्यांचा एक प्रमुख हेतू होता. घटना तयार करताना केलेल्या भाषणात सामाजिक व आर्दिक समतेची आवश्यकता त्यांनी आग्रहाने प्रतिपादित केली व त्या दृष्टीने अस्पृश्यांच्या आर्दिक विकासासाठी घटनेद्वारा राखीव जागांची तरतूद केली. 'तिरस्करणीय गुलामगिरी व अमानुष अन्याय यांच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्माला आलो आहे त्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यात मी अपयशी ठरलो तर मी स्वत:ला गोळी घालून घेईन', असे उद्‌गार त्यांनी काढले होते. अस्पृश्यांवरील अन्याय दूर व्हावा व समाजातील विषमता नाहीशी होऊन अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने सर्व हक्क मिळावेत. एव्हढेच नव्हे तर त्यांच्या उत्दाानाकरिता त्यांना खास सवलती दिल्या जाव्या याला काँग्रेसमधील प्रागतिक गटाचा पाठिंबा होताच. आंबेडकरांचे तर ते एक प्रमुख उद्दिष्ट होते. त्या दृष्टीने, अस्पृश्यतेचे निर्मूलन होऊन त्यांच्या विकासासाठी शिक्षणाची दारे खुली असावीत; समाजातील दुर्बल घटकांचे कोणत्याही प्रकारे शोषण होऊ नये; त्यांना सामाजिक न्याय मिळावा, केंद्रीय व राज्यीय शासकीय सेवात काही पदे, तसेच इंजिनिअरिंग, तांत्रिक व वैद्यकीय महाविद्यालयांत व अन्य उच्च शिक्षण देणाऱ्या विद्यालयांत प्रवेश देताना काही जागा त्यांच्याकरिता राखीव असाव्यात, अशा तरतुदी घटनेत करण्यात आल्या.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या आयुष्यभर वाणीने व लेखणीने जातीव्यवस्दोवर कडाडून हल्ला केला. त्यांची भूमिका समाजशिक्षकाची, समाजाची दु:खे दूर करण्याच्या हेतूने समतेकरिता लढा सुरू करणाऱ्या एका समाजसुधारकाची होती. आपले विचार प्रसृत करण्यासाठी त्यांनी ग्रंदालेखनही बरेच केले. भारतातील जाती, त्यांची जडण घडण व विकास यावरील त्यांचा अत्यंत महत्वाचा ग्रंदा म्हणजे Annihilation of Caste (जातीप्रदाा निर्मूलन) हा होय. जातीयतेच्या राक्षसाचा संहार केल्याशिवाय राजकीय किंवा सामाजिक परिवर्तन होऊ शकणार नाही. जात ही एक अत्यंत घातक संस्दाा आहे. शोषणाचे साधन म्हणून तिचा उपयोग केला जातो. चातुर्वण्यामुळे सामान्य जनतेचा ज्ञानार्जनाचा अधिकार नाकारला जातो. शस्त्रधारणेचा अधिकार नाकारल्याने समाजाचे अन्य घटक पौरुषहीन बनतात; समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या पायांवरच हिंदू समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे. पण त्याकरिता प्रदाम जातिभेद व चातुर्वर्ण याच्या पाठीशी असलेले धर्माचे अधिष्ठान नाहीसे झाले पाहिजे असे विचार त्यांनी मांडले. आपल्या ग्रंदांतून त्यांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या आपल्या लढ्याची तात्त्विक भूमिका स्पष्ट केली. अनेक सभांतून, परिषदांतून, मेळाव्यातून वृत्त परिषदेतून जनजागरणाला गती देऊन त्यांनी राजकीय, आर्दिक व सामाजिक हक्कांची मागणी केली. अस्पृश्यांचे राजकीय शत्रू ब्राह्मण नसून शेतीवर संपूर्ण नियंत्रण असणाऱ्या जाती होत असे ते म्हणतात. अस्पृश्यांतर्गत जातिभेदावरही त्यांनी हल्ला चढविला. आपल्या समाजाचे ऐक्य ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे; त्यापुढे सगळे गौण आहे. वादळी वातावरणाला तोंड देण्यासाठी व आपली शक्ती कार्यान्वित करण्यासाठी आपण एकसंघ असले पाहिजे असे ते दलितांना सतत बजावीत होते.

डॉ. आंबेडकरांचे जीवन म्हणजे दलित वर्गाच्या उत्दाानाकरिता केलेल्या एका अखंड संघर्षाची कहाणी आहे. 'मी तीन फक्कड गुरू केले. भगवान बुध्द, संत कबीर व महात्मा फुले.' असे त्यांनी म्हटले आहे. हे त्यांचे तिन्ही गुरू म्हणजे वैदिक संस्कृतीविरुद्ध उभारलेले बंडाचे नेते होते. भगवान बुद्धांचा धम्मविचार, कबीरांचा प्रेमभाव व ज्योतिबा फुले यांची बंडखोरी अशी शिदोरी गाठीशी बांधून ते समतेकरिता जीवनभर झगडले. भारतात केवळ राजकीय नव्हे तर सामाजिक व आर्दिक लोकशाही यावी असे त्यांना वाटत होते. त्याकरिता त्यांनी आपली सर्व विद्वत्ता पणाला लावली. अस्पृश्यांचे कल्याण व जातीभेदाचे निर्मूलन करावयाचे ते केवळ सहभोजने किंवा आंतरजातीय विवाह याद्वारे होणार नाही. तर ज्या धर्मभावनेवर जातिभेद आधारलेला आहे ती धर्मभावना नष्ट करणे हाच जातिभेद नाहीसा करण्याचा एकमेव मार्ग आहे ही त्यांची दृढ भावना होती. आंबेडकरांचा हिंदू धर्माविषयीचा राग पाहता ख्रिश्चन, मुसलमान या धर्मांचे पुढारी डॉ.आंबेडकरांना आपल्या धर्माचा स्वीकार करण्याबाबत गळ घालीत होते, परंतु आंबेडकरांना प्रारंभापासूनच सच्चरित्र व समता यावर भर देणाऱ्या बुद्ध धर्माचे आकर्षण होते. भगवान बुद्ध त्यांना समतेचा पुरस्कर्ता असा पहिला समाजसुधारक वाटत होता. बौद्ध धर्माचा पाया नैतिक आचरण हा आहे, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही मानवी मूल्ये त्या धर्माने स्वीकारली आहेत; फक्त बौद्ध धर्मातच अस्पृश्यता निवारणाचा चिरकालीन उपाय आहे अशी त्यांची खात्री पटली होती. हिंदू धर्माविषयीच्या रागामुळे धर्मांतराच्या कल्पनेने फार पूर्वीपासून त्यांच्या मनात मूळ धरले होते. १९२७ साली महाडच्या सत्याग्रहाच्या वेळीच 'समाजक्रांतीने अस्पृश्योद्धार होणार नसेल तर धर्मक्रांतीचा विचार करावा लागेल' असा इशारा त्यांनी दिला होता. हिंदू धर्मात राहून दलितांना सामाजिक, राजकीय व आर्दिक न्याय मिळू शकणार नाही ही त्यांची भावना हळूहळू दृढ होत गेली. १९३५ साली येवला येदो हिंदू धर्मातील विषमतेवर हल्ला चढविताना 'मी हिंदू म्हणून जन्मलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही' असे सांगून समता व स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी धर्मपरिवर्तन आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले होते. श्री वि.दा. सावरकरांशी धर्मांतराच्या मुद्यावर पत्रव्यवहार झाला तेव्हा सावरकरांनीही त्यांच्या धर्मांतराच्या भूमिकेला पाठिंबा दिला परंतु असा धर्म स्वीकारा की ज्यामुळे भारतीय राष्ट्रीयत्वाच्या

भावनेला हानी पोहोचणार नाही व सर्व यालाच आपले राष्ट्र मानतील असा सल्ला दिला. डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या निर्णयामुळे वृत्तपत्रांनी त्यांच्यावर टीकेची चांगली झोड उठवली. आंबेडकरांच्या धर्मांतराच्या कल्पनेमागे ब्रिटिश कपट नीती आहे; केवळ धर्मांतराने दलितांच्या आर्दिाक समस्या सुटणे व त्यांची परिस्दिाती बदलणे शक्य नाही. त्यापेक्षा गांधींची हरिजनोद्धाराची चळवळच ते उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने अधिक परिणामकारक ठरेल; आंबेडकरांच्या धर्मांतराच्या कल्पनेमागे समतेच्या तळमळीपेक्षा वैतागच जास्त आहे; त्यामुळे आंबेडकर हिंदू समाजाबरोबर आपल्या समाजाचाही घात करीत आहेत; धर्मांतराची चळवळ अस्पृश्यांनाच घातक ठरेल, अशा आशयाच्या प्रतिक्रिया, काही दोाडी वृत्तपत्रे वगळता, अनेक वृत्तपत्रांनी त्यावेळी व्यक्त केल्या. शिवाय, आंबेडकरांच्या समाजातील सर्वच प्रमुख मंडळींचा त्यांना पाठिंबा होता असेही नाही.

हिंदू कोड बिलाला झालेला विरोध, १९५२ मधील लोकसभा निवडणुकीत त्यांचा झालेला पराभव अशा घटना, हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या आंबेडकरांच्या निर्णयाला तात्कालिक दृष्ट्या कारणीभूत ठरल्या असाव्यात असे त्यावेळी काहींना वाटत होते. १९५४ पासून त्यांच्या भाषणांचे व प्रचाराचे सूत्र हिंदू धर्माची कठोर आलोचना व बौद्ध धर्माचा प्रचार हे होते. ठिकठिकाणी धर्मांतराच्या प्रचारासाठी सभा आयोजित करण्यात आल्या; व १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येदो दीक्षा भूमीवर विशाल जनसमुदायासमोर आपली पत्नी व लक्षावधी अनुयायी यांच्यासह डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. दि. १५ ऑक्टोबर १९५६ रोजी चंद्रपूर येदो २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली. १९३५ मध्ये येवला येदो एक ठराव पारित करून त्यांनी सुरू केलेल्या हिंदू धर्मत्यागाच्या चळवळीची ही फलश्रुती होती.

हिंदू समाजातील विषमता, दलितांवर शतकानुशतके झालेला अन्याय, समाज परिवर्तनाला परंपरावाद्यांकडून होत असलेला विरोध, कायद्याने अस्पृश्यतेचे निर्मूलन झाले असले तरी समाजाकडून प्रत्यक्ष व्यवहारात, त्या बदलाला मूर्त स्वरूप मिळण्यात होत असलेला विलंब या पार्श्वभूमीवर पाहता डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांसह केलेले धर्मांतर म्हणजे हिंदूधर्माविरूद्ध, त्यातील विषमतेविरुद्ध त्यांनी चालविलेल्या बंडाचे एक प्रतिक होते. त्या धर्मांतराने दलित समाजात एक नवी जागृती आली व त्यांचे मनोबल उंचावले हे खरे. परंतु त्यामुळे व्यावहारिक दृष्ट्या त्यांच्या आर्दिाक परिस्दिातीत किती उल्लेखनीय सुधारणा घडून आली किंवा त्यामुळे जातिभेदाला कितपत मूठमाती मिळाली हा चिंतनाचा विषय आहे. डॉ. आंबेडकर हे एक गाढे विद्वान व दलितांच्या उत्दाानाकरिता जीवनभर कळकळीने झगडणारे असे नेते होते. त्या समाजातील जनतेचा न्यूनगंड नाहीसा करून त्यांच्या मनात आत्मविश्वासाची एक नवी ज्योत त्यांनी जागविली. स्वातंत्र्यासाठी त्या काळी संपूर्ण देशात चालू असलेल्या गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय चळवळीपासून मात्र ते पूर्णपणे अलिप्त राहिले. ब्रिटिश अधिसत्तेविरुद्ध लढा देत असलेल्या काँग्रेसवर व विशेषेकरून गांधीजींवर त्यांचा विशेष रोष होता. काँग्रेसशी कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये आणि गांधी चालवीत असलेल्या अहिंसात्मक असहकार चळवळीत सहभागी होऊ नये अशीच शिकवण त्यांनी आपल्या वर्गबांधवांना दिली. त्यांचा जहाल काँग्रेसविरोध, हिंदू समाजापासून फुटून निघण्याचा त्यांचा विचार, दलितांच्या स्वतंत्र मतदार संघाकरिता त्यांनी धरलेला आग्रह, देशाच्या फाळणीच्या कल्पनेला त्यांनी दिलेला पाठिंबा अशा गोष्टींवर, ब्रिटिशांच्या भारतातील भेदनीतीला त्या पोषक ठरतात, असे काहींना वाटल्याने त्याकाळी बरीच टीकाही झाली. त्या काळच्या स्वातंत्र्यलढ्यात ते सहभागी न झाल्याने त्यांचे नेतृत्वही राष्ट्रीय नेतृत्व म्हणून विकसित होऊ शकले नाही. पण हिंदू समाजातील विषमतेविरूद्ध व पारंपारिक सामाजिक अन्यायाविरद्ध सातत्याने झगडणारे, दलितांच्या जीवनाला नवा अर्दा प्राप्त करून देणारे, त्यांना न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी नेटाने कार्य करणारे झुंझार नेते व सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते म्हणून डॉ. आंबेडकरांचे मोठेपण निश्चित वादातीत आहे. वर्णव्यवस्दाा, जातिव्यवस्दाा, अस्पृश्यता यांच्या निर्मूलनासाठी मांडलेले मौलिक विचार हा त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा गाभा होता. राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत झाले पाहिजे; समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या तत्त्वांवर आधारलेला जीवनमार्ग म्हणजे लोकशाही म्हणून केवळ एक माणूस - एक मतच नव्हे तर 'एक माणूस एक मूल्य' हे तत्त्व खऱ्या अर्दााने समाजात बाणले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. दलित जाती जमातीत स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करण्यासाठी त्यांनी आपले सामाजिक तत्त्वज्ञान विशद केले. जात हा समाजाला जडलेला एक भयावह रोग आहे; एक शाप आहे. त्याचे निर्मूलन होणे सुदृढ समाजव्यवस्दोकरिता अत्यावश्यक आहे याची जाणीव समाजाच्या मनात जागृत व्हावी याकरिता ते अहर्निश झटले.

**जातिव्यवस्दाा:-** डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक विचारात जात, धर्म, अस्पृश्यता, स्त्री-शिक्षण इत्यादी विचारांचा समावेश होतो. ज्या अस्पृश्य समाजात ते जन्मले होते त्या समाजाची गुलामी नष्ट करण्यासाठीच ते भारताच्या समाजकारणात व राजकारणात उतरले. अगदी लहानपणापासून त्यांना त्यांच्या 'अपमान' व अवहेलना सोसाव्या लागल्या होत्या. पण जेव्हा ते परदेशातील उच्च विद्येच्या पदव्या प्राप्त करून मायदेशी आले, तेव्हाही त्यांची अवहेलना होतच राहिली. बडोद्यात असतांना त्यांना हिंदु हॉटेलात जागा मिळु शकली नाही. एवढेच नव्हे तर बडोदा संस्दाानात लष्करी सचिव या उच्च पदावर असतानाही त्या खात्याच्या कारकुनांनी, शिपायांनी व अंमलदारांनी त्यांना महारोग्याप्रमाणे वागवले. नोकर, कार्यालयाची कामे त्यांच्या टेबलावर दुरुन फेकून देत. पिण्याचे पाणी त्यांना कार्यालयात मिळू शकले नाही. या अवहेलनेतूनच डॉ. आंबेडकरांमधील समाजक्रांतिकारक बंड करून उठला. डॉ. आंबेडकरांचे जातिव्यवस्दोसंबंधी विचार अतिशय स्पष्ट होते. अस्पृश्यांना ज्या पद्धतीने वागविण्यात आले त्यावरून त्यांची जातिव्यवस्दोसंबंधी

विचारांची निर्मिती झाली. अस्पृश्य जातिच्या उत्पत्तीची कारणमिमांसा स्पष्ट करताना ते म्हणतात, अस्पृश्यता ही मानवनिर्मित आहे. दोन वेगवेगळ्या टोळ्यांत जेव्हा संघर्ष होऊन एका टोळीचा पराभव होई तेव्हा पराजित टोळीला विजेत्या टोळीच्या आश्रयाला जावे लागे. तेव्हा विजेते पराजितांना गावाबाहेर जागा देत. गावावरील आक्रमणाच्या वेळी अशा पराजितांचा उपयोग करण्यात येत असे, कालांतराने त्यांना अस्पृश्य ठरविण्यात आले. पुढे त्यांचे छळ, शोषण होऊ लागले. सर्व प्रकारची नवी कामे त्यांच्याकडून करून घेण्यात येऊ लागली. अशाप्रकारे अस्पृश्य जातीची उत्पत्ती झाली असे आंबेडकर म्हणतात. जातिव्यवस्दाा अमानवीय असून अस्पृश्यांच्या प्रगतीला ती घातक आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. आंबेडकरांना दलितांचे नेते म्हणवून घेणे अधिक पसंत होते. ते म्हणतात, 'जातिव्यवस्दोने' समाजाचे विघटन केले. श्रेष्ठ-कनिष्ठ भेद निर्माण होऊन एकमेकांत द्वेष निर्माण झाला. आम्ही पौराणिक ग्रंदाांना प्रमाण मानत असल्यामुळे जातिव्यवस्दोकडे बुद्धिप्रामाण्यवादी दृष्टीकोनातून पाहिले जात नाही याची आम्हाला खंत वाटते. चातुर्वर्ण्य हा तेव्हा हिंदु समाजाचा आधार बनला होता. मनुस्मृतीमुळे सामाजिक न्याय, सामाजिक हक्क नष्ट होऊन त्याचा परिणाम शुद्रांवर अन्याय करण्यात झाला असे त्यांना वाटत होते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे जाहीररित्या दहन केले. आणि अस्पृश्यांवरील अन्यायाचा प्रतिकात्मक विरोध केला. १९२७ साली अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा हक्क मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी आंदोलन सुरू केले. कुलाबा जिल्ह्यातील गाजलेला महाड येदील 'चवदार तळ्याचा सत्याग्रह' हा याचवेळी झाला. यावेळी डॉ.आंबेडकरांनी केलेले भाषण, त्यांची अस्पृश्यांबद्दलची तळमळ व अन्यायविरोधी चीड व्यक्त करणारे आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात, "मित्रहो, आपण माणसासारखीच माणसे आहोत, तरी आपणास जनावराचे जिणे कंठावे लागत आहे. ही मोठी नामुष्कीची गोष्ट आहे. तुम्ही हाडामासाने हिंदू आहात, तरी तुम्हास पाणवठ्यावर पाणी मिळत नाही, देवळात जाऊन देवाचे दर्शन घेता येत नाही किंवा सार्वजनिक ठिकाणी दिमाखाने बसता येत नाही... हा अन्याय सहन करता कामा नये. तुम्ही स्वत:च आपल्या पायावर उभे राहून आपल्या हक्कासाठी झगडले पाहिजे. त्यासाठी तुमची पिढी खलास झाली तरी बेहतर." या सत्याग्रहाच्या वेळी सवर्ण हिंदूंनी अस्पृश्यांवर हल्ला केला. पण त्यामुळे अस्पृश्यांची आपल्या ध्येयांवरील निष्ठा अधिकच दृढ झाली. पुढे नाशिक येदील काळाराम मंदिरातील अस्पृश्यांच्या प्रवेशाबद्दल मार्च १९३० मध्ये डॉ. आंबेडकरांनी असाच एक सत्याग्रह केला. मनुस्मृतीचे दहन करून; किंवा काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेशासाठी धरणे देऊन अस्पृश्यता नष्ट होणार नाही याची त्यांना कल्पना होती. पण अस्पृश्यता स्वाभिमान जागृत करण्यासाठी ते आवश्यक होते असे आंबेडकरांचे याबाबतीतील मत होते.

डॉ. आंबेडकरांचा जातीची बंधने तोडण्यावर अधिक भर होता. जातिव्यवस्दोमुळे रोटीबेटी व्यवहारावर बंदी आली आहे. त्यामुळे जातीची बंधने अधिक तीव्र झाली आहेत. हे सर्व नष्ट करण्यासाठी पुर्नविवाह, आंतरजातीय विवाह झाले पाहिजेत यावर त्यांनी भर दिला. त्यावेळी जातीबाहेर टाकण्याची प्रदाा अस्तित्वात होती. त्यामुळे अनेक नव्या जाती निर्माण झाल्या. जातीची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. जातीमधील संघर्ष तीव्र होऊ लागले. परिणामतः समाज विघटित झाला. राष्ट्रभक्ती आणि एकता कधी निर्माण होऊच शकली नाही. आजही हा प्रश्न तसाच शिल्लक आहे. कायद्याने हा प्रश्न सुटत नाही त्यासाठी समाजाचे मतपरिवर्तन होणे आवश्यक असते. या सर्व कारणांमुळे अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य डॉ. आंबेडकरांनी करून अस्पृश्य समाजास मोठा दिलासा दिला.

**अस्पृश्यता:-** खरे बघता डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य शब्द मान्यच नव्हता. गांधीजींनी हरिजन शब्द दिला होता तोही त्यांना मान्य नव्हता. कारण नाव बदलले म्हणजे परिस्दिाती सुधारेल यावर त्यांचा विश्वास नव्हता. आंबेडकरांच्या स्वाभिमानी मनाला हे शब्दप्रयोग पसंत पडण्याजोगे नव्हते. स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार ही त्रीसूत्री त्यांनी आपल्या समाजाला दिली. गोलमेज परिषदेत त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले होते की आम्हाला अस्पृश्य वा हरिजन म्हणण्यात येऊ नये. तर आम्हाला 'प्रोटेस्टंट हिंदू' ही संज्ञा द्यावी. आंबेडकरांच्या मते, धर्म माणसांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक आहे. धर्मामुळे आत्मसमाधान मिळते. यासाठी त्यांनी धर्माची आवश्यकता मान्य केली. फक्त यासाठी त्यांनी एकच अट सांगितली की, धर्मात उच्च-नीचता नसावी. धर्माने सर्व माणसांना सारखे समजावे. हा त्यांचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. हिंदुधर्माकडे पाहताना त्यांना असे आढळून आले की, हा धर्म विषमतेवर आधारलेला आहे. जनावरांपेक्षा वाईट वागणूक यात कनिष्ठ जातीच्या लोकांना देण्यात येते याचा त्यांना अनुभव होता. जातिव्यवस्दाा समाजाच्या मनात खोलवर रुजविण्यात हिंदु धर्माचा सर्वात मोठा वाटा आहे याची त्यांना खंत होती. अस्पृश्य लोकांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, जगण्यासाठी समान अधिकार मिळावे ही त्यांची इच्छा होती. हिंदू धर्मात राहून हे सर्व अशक्य आहे म्हणून या धर्माचा त्याग केला पाहिजे हा विचार त्यांच्या मनात आला. आंबेडकरांच्या मते बौद्ध धर्मात असमानता, विषमता इत्यादींना स्दाान नाही. 'सर्वजन हिताय आणि सर्वजन सुखाय' या कल्पनेवर हा धर्म आधारलेला आहे. म्हणून त्यांनी बौध्द धर्मात प्रवेश केला. आंबेडकरांनी अगदी दूरचा विचार करून बौद्ध धर्म स्विकारला. हा धर्म स्विकारण्यापूर्वी ते अनेकदा म्हणाले होते की, "जो धर्म या देशातील प्राचीन संस्कृतीला धोका देईल, किंवा अस्पृश्यांना अराष्ट्रीय बनवील असा धर्म मी कधीही स्विकारणार नाही. कारण या देशाच्या इतिहासात 'विध्वंसक' म्हणून स्वत:च्या नावाची नोंद करून घेण्याची माझी इच्छा नाही." यावरून आंबेडकर राष्ट्रवादी होते हेही स्पष्ट होते. आंबेडकरांनी शिख, इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्मात यावे यासाठी त्या त्या धर्माच्या लोकांनी अनेक प्रयत्न केले परंतु त्यांनी भारतीय संस्कृतीचाच

एक भाग असलेल्या बौद्ध धर्मातच प्रवेश केला.

**त्रीचा दर्जा:-** स्त्रियांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणूक मिळावी असे त्यांचे मत होते. सर्वांगीण विकासासाठी स्त्री-शिक्षणावर त्यांनी भर दिला. स्त्रियांना शिक्षण प्राप्त झाल्यास कुटुंबाचा विकास होईल. जीवनमान सुधारण्यासाठी आणि कुटुंबाला नैतिक वळण लावण्यासाठी स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे ते म्हणत. बालविवाहास त्यांनी संपूर्ण विरोध केला. स्त्रियांनी कपडा व दागदागिन्यापेक्षा आपल्या कलागुणात वाढ करण्यावर अधिक भर द्यावा असे त्यांनी प्रतिपादित केले. आंबेडकरांच्या सामाजिक विचारानुसार समताधिष्ठित समाज असावा. जात, धर्म, लिंग इत्यादी आधारावर समाजात भेदभाव नसावा. डॉ.आंबेडकरांच्या विचारामुळेच आज कायद्यासमोर सर्व नागरिक समान मानले जातात. भारतीय संविधानातही समतेचे तत्व अंतर्भूत करण्यात आले आहे. कायद्याने अस्पृश्यता पालनास बंदी घातली गेली आहे. अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा मानला जातो.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की डॉ. आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य अस्पृश्यांच्या उद्धारासाठी खर्च केल्यामुळे अस्पृश्यांचे निर्विवाद पुढारी म्हणून त्यांचे नाव चिरस्दायी झाले यात शंका नाही. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात किंवा राष्ट्रीय चळवळीत त्यांनी फारसा भाग घेतला नाही, म्हणून ते राष्ट्रवादी नव्हते असे म्हणता येणार नाही. धर्मातीत राष्ट्रवादाचे ते पुरस्कर्ते होते, धर्मावर आधारित राष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. भारताच्या संविधानाच्या स्वरुपात देशाला त्यांनी एक अनमोल देणगी दिली. म्हणूनच 'भारतीय घटनेचे शिल्पकार' असा त्यांचा सार्दा गौरव केला जातो. डॉ. आंबेडकर हे केवळ अस्पृश्य समाजाचेच नेते नाहीत तर ते संपूर्ण मानवजातीचे नेते आहेत. ते खऱ्या अर्दाने **'भारत-रत्न'** आहेत.